
ISSN: 2229-4856
Abhisaran
VOL. XV SPECIAL ISSUE APRIL 2016

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS



PART III

*Editors*
**Dr. Vasant Sanap**
**Mr. Shailesh Akulwar**

Scanned by CamScanner

२६. महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य-प्रा.कृष्णा सुदाम इंगळे । १२०
२७. महात्मा गांधी यांचे राष्ट्रीय एकात्मतेतील योगदान-प्रा. गंगाधर चव्हाण । १२३
२८. महात्मा गांधी आणि ग्रामीण स्वराज्य - प्रा. गजानन बाबुराव गरगीळ । १२७
२९. महात्मा गांधीजींच्या सामाजिक व ग्राम विकासाचे मूल्यमापन -प्रा. सिद्धार्थ कुंडलीक इंगोले । १३०
३०. महात्मा गांधी च्या औद्योगिक धोरणाची उपयुक्तता -प्रा.वैशाली पाटील । १३३
३१. महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज संकल्पना व ग्रामिण विकासातील योगदान -प्रा. खरात बि.एस. । १३७
३२. महात्मा गांधी यांचा आर्थिक दृष्टीकोन -डॉ.मुरलीधर कुंडलीक इंगोले । १४१
३३. वर्तमान काळात महात्मा गांधीजी यांचे आर्थिक विचारांची उपयोगिता : एक अभ्यास-प्रा. ए.एच. घोंगडे । १४५
३४. महात्मा गांधींचे शिक्षणविषयक विचार-संतोष जाधव । १५०
३५. महात्मा गांधीजींचा शैक्षणिक दृष्टीकोन -प्राचार्य डॉ. अरूण दळवे, प्रा. मकरंद जोगदंड । १५४
३६. गांधीवादाचा मराठी वाङ्मयावरील परिणाम -प्रा. डॉ. खोडेवाड डि. पी. । १६०
३७. गांधी विचार : वर्तमान काळातील गरज - प्रा.संदिप कोरडे । १६४
३८. महात्मा गांधीजींचा माणूसकेंद्री यांत्रिक दृष्टीकोन - कुलकर्णी सागर शरद । १६९
३९. महात्मा गांधींच्या विचारांची प्रस्तुतता- प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबूराव । १७३
४०. महात्मा गांधी यांचे सामाजिक ,आर्थिक राजकिय विचार -प्रा.लोखंडे बी.बी. । १७८
४१. महात्मा गांधी आणि सहिष्णुता -प्रा.डॉ.पी.एस.लोखंडे । १८२
४२. म. गांधी आणि ग्रामस्वराज्य- प्रा. डॉ. मुंढे के. जे. । १८६
४३. गांधीवादी जीवनमूल्ये - बाळासाहेब वामनराव सोनवणे । १८९
४४. म.गांधीजीचे आर्थिक विचार- प्रा.व्ही.बी.चांदजकर । १९४
४५. महात्मा गांधी आणि शैक्षणिक धोरण -प्रा.डॉ.एम.एफ.राऊतराहे । १९८
४६. महात्मा गांधी आणि लोकशाही राज्य- डॉ. राजेंद्र साहेबराव धाये । २०१
४७. महात्मा गांधीची शिक्षणनिती - डॉ. शिवाजी जवळगेकर । २०५
४८. महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्या बद्दलचे विचार - प्रा.डॉ. दिनेश रा. हंगे । २०९
४९. महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार व परिवर्तन - प्रा. रसाळ मंजुषा । २१३
५०. महात्मा गांधीजीचे शिक्षण विषय विचार - प्रा.डॉ.व्यंकटेश ज. खरात । २१८
५१. महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार -श्री. प्रा. खर्डे अरुण चांगदेव । २२१
५२. महात्मा गांधीजींचा ग्राम स्वराज्यविषयीचा दृष्टीकोन...- डॉ.सोमवंशी मुक्ता । २२५
५३. महात्मा गांधींचे हिंद स्वराज्य : एक अंतरंग -प्रा.डॉ. रामनाथ गंगाधर वाढे । २२९
५४. महात्मा गांधीजीचे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विचार -मस्के प्रणाली जालिंदर । २३३



Scanned by CamScanner

# 39.

## महात्मा गांधींच्या विचारांची प्रस्तुतता

**प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबूराव**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड.

**प्रस्तावना :-** युरोप वैज्ञानिकांचा तर भारत समाज सुधारक व महापुरुषाचा देश आहे. जगातल्या सर्व मानवांना समान माणून त्यांच्या शाश्वत कल्याणाच्या चिंतनास कार्यात्मकतेचा आधार देणारे अनेक महापुरुष भारतात जन्मास आले. त्यांनी आपापल्या युगात सामाजिक राजकीय आर्थिक सिध्दांताची मांडणी करुन त्याची रुजवणूक केली. ते करण्याचे प्रत्येकाचे मार्ग वेगवेगळे होते. जग आणि मनुष्य परिवर्तनशिल आहे. परिवर्तनाच्या प्रक्रियेत सर्वच महापुरुष व्यक्तीच्या समाज पटलावर स्मरणात राहतील असे नाही. ज्या महापुरुषांच्या विचार व कार्यामुळे व्यक्तीच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला. जगण्याच्या नव्या संधीना अधिकाराचा आधार मिळाला. सर्वांना स्वत्वाची व स्वाभिमानाची जाण झाली. नव्या युगाचा प्रारंभ झाला. अशाच महापुरुषास प्रवाहीत व्यवस्था चिरस्मरणात ठेवते. भारतासह जगातील सर्वच व्यक्तींच्या चिरस्मरणात राहणारा एक महात्मा म्हणजे मोहनदास करमचंद गांधी होय. गांधींनी पारतंत्र्याच्या युगात व साम्राज्यवादी व्यवस्थेत भारतीय समाजकारण, सामाजिक चळवळी, राजकारण, अर्थकारण, स्वातंत्र्य आंदोलन, ग्रामविकास, राज्यसंस्था, जागतिक शांतता, इ.ला नवी दिशा दिली.

आज संपुर्ण जग ज्या प्रकारच्या संकटातुन मार्गक्रमण करत आहे. तेंव्हा महात्मा गांधीच्या मुलभूत संदेशांना सदैव आठवण करण्याची गरज भासत आहे. शांतता आंदोलन, पर्यावरण आंदोलन, महिला आंदोलन, लोकशाहीस बळकट करणारे आंदोलन यात नेहमी महात्मा गांधींचे संदेश व विचार ऐकण्यास मिळतात. तसेच या सर्व आंदोलनास गांधीच्या मार्गाने चालविले जाते.

गांधी तत्वज्ञान जीवनाच्या अनेक प्रसंगांना शक्ति व प्रेरणा देवून निरंतर प्रवाहित होणारे एक स्त्रोत आहे. जे अनेक दशकापर्यंत एक दिपस्तंभ म्हणून टिकून राहील. तसेच वर्तमान वैश्विक खेडे आणि बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेच्या या युगात गांधीवादाची प्रासंगिकता वाढेल. गांधीचा जन्म भारतात उच्च शिक्षण इंग्लंडमध्ये आणि राजकीय संघर्षाचे प्रशिक्षण दक्षिण अफ्रिकेत झाले. या तिन्ही देशात मिळालेल्या अनुभवाचा प्रयोग भारतास स्वतंत्र करण्यासाठी केला. महात्मा गांधीनी जागतिकीकरणाचा अनुभव घेतला असल्यामुळे त्याच्यातुन होणारा फायदा व नुकसानाप्रती गांधी सजग होते. गांधी वैश्विकरणास प्राचीन घटना मानत. वैश्विकरणात होणाऱ्या अनेक संस्कृतींच्या संघर्षात भारतीय संस्कृतीस कोणताही धोका होणार नाही हे गांधी ओळखून होते. जागतिक समाजाच्या निर्मितीसोबत सार्वभौम राष्ट्रांस फक्त राजकीय आणि सांस्कृतिक

Scanned by CamScanner

वसाहतवाद, औद्योगिकरणासोबत वर्ग संघर्ष आणि पर्यावरणीय समस्यांचा ही मुकाबला करावा लागेल याची जाण होती. जे कालांतराने सिध्द झाले. साम्यवादी रशियाच्या पतनानंतर जागतिक अर्थव्यवस्थेवर भांडवली विचारधारेचे प्रभुत्व निर्माण झाले. W.T.O मध्ये विकसित आणि विकसनशील देशात कृषी सब्सीडी, पर्यावरण, मानवी हक्क, दहशतवाद इ. विषयावर होणारी गंभीर चर्चा मानव जातीच्या रक्षणासंबंधी गांधी विचारांच्या महत्वास रेखांकित करते. गांधीवादाच्या सत्याग्रह व अहिंसेचा यशस्वी प्रयोग दक्षिण अफ्रिकेत नेलसन मंडेलाद्वारे रंगभेदाचा अंत करण्यासाठी करण्यात आला. संयुक्त राज्य अमेरिकेतील मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर मार्फत काळ्या रंगाच्या लोकांच्या अधिकारासाठी करण्यात आला. त्याचा परिणाम अमेरिकेत ४४ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून बराक ओबामाच्या निवडीत झाला. जगातील अन्य देशात ही व्यवस्थेला विरोध करण्यासाठी गांधीवादी मार्गाचा वापर केला जात आहे. उदा.दलाई लामा, डेसमंड टूटू, ऑंग सॉन सू की , अण्णा हजारे, आईनस्टाईन, शिझर शॅवेस, सॅम पित्रोदा इ. पुढेही करतील सांप्रदायीक कट्टरता आणि दहशतवादाच्या या युगात गांधीवाद सांप्रदायिक सद्भावना टिकवण्यासाठी सर्वधर्मांप्रति समान भाव राखण्याचा विचार मांडतात. जो गांधीवादाची अधिक प्रस्तुतता सिध्द करतो. आज ही भारतात सांप्रदायिक तणावाला शांत करण्यासाठी प्रभावकारी उपाय म्हणून सर्वधर्म प्रार्थना सभा, प्रभात फेरी इ. गांधीवादी साधनाचा वापर केला जातो. गांधीवादी सिध्दांताचा आधार अहिंसा आणि सत्याग्रह आहे. जे सत्य, प्रेम, शिस्त आणि न्यायावर आधारित आहेत. वैश्विकरणाच्या युगात गांधीवादाची उपयोगिता आणि प्रस्तुतता विचारात घेवूनच युनोने १५ जुन २००७ ला २ ऑक्टोंबर (गांधी जन्मदिवस) हा जागतिक अहिंसा दिवस म्हणून घोषित केले.

गांधी तत्वज्ञानाचे वैशिष्ट्ये आहे की, ते राज-रंक, साधारण-असाधारण, कमजोर-बलवान, या सर्वांसाठी कांहीतरी देणारे आहे. ते राजाला नियंत्रीत करते. गरिबाने गरिबीस अभिशाप समजू नये असा सल्ला देतात. प्रत्येकात या पृथ्वीवर स्वर्ग उतरवण्याची क्षमता आहे हे सांगतात. एक ना एक दिवस तुमच्याही कार्यप्रणालीचे अंदाजपत्रक जनता करते असा संदेश राज्यकर्त्यांला देतात. जगाच्या दुःखावर सर्व औषध निकामी ठरतील तेंव्हा फकीराची दुआ (आशिर्वाद) कामाला येते असा सल्ला फकिराला देतात. गांधीवाद जगातील हतबलातील हतबल व्यक्तिला विश्वास देतात की, न्यायाच्या मार्गाने चालल्यास एक दिवस तुही प्रथम येशील. काही असामान्य करून दाखवण्याच्या इच्छेने प्रेरित होणाऱ्या लोकांना सावधान करतात की, तुमच्या असाधारण करण्याच्या इच्छेने जगाचा विनाश होवू नये.

गांधीच्या मते असहिष्णुता पण एक हिंसा आहे. जी लोकशाही विकासातील अडथळा आहे. गांधीच्या अनुयांयाची यादी फार विशाल आहे. तसेच ती प्रभावशाली पण आहे. गांधीला आदर्श मानणाऱ्या अर्धा डझन पेक्षा अधिक विश्व नेत्यांना शांततेसाठी नोबेल पुरस्कार मिळाला. त्यातील बरेच लोक गांधीला केंव्हा भेटले नाहीत. बऱ्याच जणांनी



Scanned by CamScanner

गांधीना पाहिले ही नाही. त्या सर्वांकडे फक्त गांधी विचार होते. त्याचा आधार घेवून त्यांनी महान ध्येयाच्या दिशेने मार्गक्रमण केले. गांधी विचारांची ही एक प्रस्तुतताच आहे.

जगाच्या राजकारणात गांधीच एकमेव असे व्यक्तिमत्व असावे की जे स्वातंत्र्याचे कर्ता-धर्ता असूनही स्वातंत्र्यानंतर सत्तेपासून दुर राहिले. रशियात लेनिन, तुर्कीत मुस्तफा कमाल पाशा, पाकिस्तानचे संस्थापक मोहम्मद अलि जीना, इजिप्तचे अब्दुल नासिर, चीनमध्ये माओ-त्से-तुंग आणि चाऊ-एन-लाय, बर्मात जनरल यांग सन, श्रीलंकेत भंडारनायके आणि बांग्लादेशात मुजीबुर रहमान यासह अनेक देशात स्वातंत्र्यानंतर देशाची सत्तेचे सुत्र स्वातंत्र्य नायकाने आपल्या हातात घेतली. नेपाळमधील गणेशमान सिंह आणि महात्मा गांधी यांचा समावेश स्वातंत्र्यानंतर सत्तेपासून दूर राहाणाऱ्यात होतो. लुई फिशरच्या मते - आधुनिक इतिहासातील वुड्रो विल्सन, लिंकन, नेपालियन या नामवंत व्यक्तिकडे राज्याची सत्ता होती. लोकांच्या मनावर प्रभाव टाकणाऱ्या अशासकीय व्यक्तित गांधीप्रमाणे कार्ल मार्क्स ही होता. व्यक्तिच्या अंतरआत्म्यावर प्रभाव टाकण्यात गांधीचे श्रेष्टत्व आहे. ज्या युगाला सत्ता, धन आणि अहंकाराने प्रभावित केले. त्याच्या प्रभावाखाली टिकणारे कोणीच नाही. अशा युगात गांधी एक उत्तम पुरुष कसे बनले ? या विषयी गांधी विचारांकडून आजच्या मानवाला घेण्यासारखे पुष्कळ आहे. गांधी सर्वात अधिक निसर्ग आणि पृथ्वीच्या जवळचे होते. जीवनातल्या छोट्या-छोट्या गोष्टीतच जीवनाचा अर्थ दडलेला आहे. रोम्या रोलांच्या मते - त्यांना पाहून मला सर्वात अधिक सॉक्रेटिसची आठवण होते. कोणत्याही प्रकारचा दिखावा न करता ते अधिक सामर्थ्यवान विधान करत, जे जगाचे स्वरुप बदलणारे असत.

दहशतवादाविरुध्द होणाऱ्या युध्दामुळे अनेक देशात लाखो लोक मृत्युमूखी पडत आहेत. अरबों डॉलरचा खर्च होत आहे. लाखो निरपराध, निष्पाप लोक, अमेरिकन सैनिक तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या देशांच्या सैनिकांचे प्राण ही जात आहेत. अशा परिस्थितीत वाढती आर्थिक मंदी, बेकारी आणि मानवी हक्क व पर्यावरणाचे हणन होत आहे. २००९ मध्ये अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणूकीत सत्य, अहिंसा आणि शांततेविषयी बोलणाऱ्या काळ्या वंशाच्या बराक ओबामाला अमेरिकन लोकांनी राष्ट्रध्यक्ष बनवले. जगात नेहमी युध्द, आक्रमण, प्रभुत्वाची भाषा करणाऱ्या अमेरिकन जनतेने शांतता व अहिंसेविषयी बोलणाऱ्या बराक ओबामास निवडूण देण्यामागे काय रहस्य आहे ? सर्व लोकांनी बराक ओबामाचे का समर्थन केले ? या सर्व प्रश्नांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर एक प्रश्न निर्माण केला की, आजच्या हिंसायुक्त वातावरणात महात्मा गांधीच्या आदर्शाची पुन्हा प्रस्तुतता भासत आहे का ? बराक ओबामाने आपल्या सिनेट कार्यालयात निवडणुका दरम्यान शांतिचा संदेश देणारे गांधीचे तैलचित्र लावले. जगातील कोणत्याही साम्राज्यवादी व शोषणकारी शक्तींचा विरोध शांततेच्या मार्गाने विरोध करण्याच्या गांधीच्या पध्दतीचा प्रभाव ओबामावर अधिक पडला. सत्ता



Scanned by CamScanner

परिवर्तनाचे आणि जग बदलाचे वास्तविक परिणाम वॉशिंग्टन ऐवजी जनतेतून येतात हे मला सदैव आठवणीत रहावे यासाठी गांधीचे तैलचित्र लावल्याचे ओबामा सांगतात. महात्मा गांधी सर्व धर्मसमभावाचे मुर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्या मते कोणत्याही स्तरावर होणारी हिंसा समस्येचे संपूर्ण व स्थाई समाधान शोधु शकत नाही. महात्मा गांधीनी चहोबाजूनी होणाऱ्या हिंसात्मक कार्यवाहीच्या युगात अहिंसेचे तत्वज्ञान मांडले व रुजवले. अहिंसेने हिंसेला पराजित करण्याचा गांधीनी दिलेला संदेश आजही उपयुक्त व मार्गदर्शक आहे.

गांधीच्या प्रस्तुततेचा विषय बहुआयामी व बहुव्यापक आहे. विभिन्न दृष्टीकोणातून त्याचे विश्लेषण करता येते. बदलत्या कालमानानुसार व्यक्तिपरत्वे त्याची नव्या अंगाने मांडणी होत आहे. या विचारधारेचा प्रचार अत्यंत तीव्र गतिने होत आहे. भारतच नाही तर संपूर्ण जगात गांधी विचारधारेस जीवंत अस्तित्व लाभत आहे. परंतु गांधींच्याच देशात त्यांच्या वारसदारांनी त्या विचारधारेला पुढे नेण्यात आवड दाखवली नाही. त्यामुळे अनेक नवनवीन समस्यांचा सामना करावा लागत आहे. भौतिकवादाच्या आंधळ्या स्पर्धेत गांधीच्या अध्यात्मवादी विचारधारेस जमीनदोस्त केले जात आहे. ज्या लोकांसाठी गांधीनी आपल्या आयुष्यातील सुवर्णकाळ संघर्षात घालवला. तेच लोक गांधीवादाची चेष्टा करतात. गांधीविषयी अपशब्द वापरतात. समाजात होणाऱ्या नैतिक मुल्यांच्या ऱ्हासाचे ते प्रतिक आहे. गांधीच्या देशात शिल्लक राहिलेल्या गांधीवादी अनुयायांना ऐकूण घेण्याची मानसिकता लोकांची नाही. परंतु स्वतःस गांधीवादाचे वारसदार म्हणून गर्वाने सांगतात व मिरवतात. याचा तसा सरसकट अर्थ काढणही चुकीचे ठरेल. परंतु प्रमाण मात्र अधिक आहे. गांधीवादाचे तत्वज्ञान गांधीकाळापेक्षा आज अधिक प्रस्तुत आहे. कारण आज संपूर्ण विश्व अण्विक आणि जैविक शस्त्रास्त्रांच्या भितीने घाबरलेले आहे. संपुर्ण विश्व भोगवादी बनले. अतिभोगवादी बनण्याची स्पर्धा लागली आहे. ज्यात मैत्री, सहिष्णुता, बंधुभावा ऐवजी घृणा, शत्रुत्व निर्माण झाले. तेंव्हा गांधीवाद हाच एक विकल्प आहे. ज्यांनी संपुर्ण जगाला अहिंसेची शिकवण दिले. महात्मा गांधी Young India या वृत्तपत्रात लिहीतात हिंसेने भरलेल्या वातावरणात अहिंसेचे तत्व अवलंबिणारे ऋषीमुनी न्युटनपेक्षा निश्चितच प्रज्ञावान होते. तसेच वेंलिग्टन पेक्षाही वीर योध्दे होते. कारण सर्व शस्त्राची माहिती असूनही त्याचा व्यर्थपणा त्यांनी जाणला होता. आणि दुःखी जगाला मार्गदर्शन केले होते की, मुक्ती हिंसेद्वारे नव्हे तर अहिंसेद्वारेच प्राप्त होत असते. जग प्रसिध्द तंत्रज्ञ सॅम पित्रोदा यांनी ॲक्शन इंडिया चळवळींचा शुभारंभ गांधीजीच्या साबरमती आश्रमातूनच केला.

महात्मा गांधीचे स्त्री स्वातंत्र्य, स्त्री शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, ग्रामविकास, सत्ता विकेंद्रीकरण, अस्पृश्यता निवारण, आदर्श गाव, शेतकरी, शेत मजूर, मानवी हक्क, सामाजिक न्याय, समता, विवेक, दया, प्रेम, बंधुता, शिक्षण या सर्वाबाबतीचे चिंतन मुलभूत व मार्गदर्शक आहे. जीवन जगण्यातील मानवी स्पर्धेला सुखकर व स्पर्धा विहीन बनवणारे आहे. पर्यावरण, राष्ट्र, व्यक्ति, यांच्या कल्याणार्थ गांधी विचारधारा उपयुक्त



Scanned by CamScanner

आहे. ज्याचे चित्रीकरण लगे रहो मुन्नाभाई या चित्रपटात केले. गांधीगिरी या नावाने ते प्रसिध्द व सुपरिचित बनले.

गांधीवादी विचार व सिध्दांताची कांही अभ्यासकांनी चिकित्सा केली. त्यांच्यामते गांधीवाद अव्यवहारिक व काल्पनिक आहे. कांही प्रमाणात हा विचार वरकरणी पहाता सत्य वाटतो कारण मानवी स्वभावाबाबत गांधीचे चिंतन आदर्शवादी आहे. आधुनिक आण्विक युगात गांधीच अहिंसा, सत्याचा सिध्दांत व्यवहार्य नाही. २१ व्या शतकात या पृथ्वीवर राहणाऱ्या मोबाईल व तंत्रज्ञानी माणसासाठी गांधीना अपेक्षित वर्तन व विचाराप्रमाणे वागणे शक्य नाही. व्यावसायिक राजकारणाच्या युगात राजकीय विचार व्यासपीठावरुन बोलण्या इतपतच उपयुक्त ठरतात. अहिंसात्मक राज्याची संकल्पना वर्तमान युध्दग्रस्त जगात कोणत्याही देशासाठी आत्मघातकी ठरणारी आहे. कुटीर उद्योग वर्तमान जीवनाच्या गरजा पुर्ण करु शकत नाही.

गांधी तत्वज्ञानाविषयी चिंतन व्यवहार्य आहे. परंतु गांधीनी त्या आदर्शांना स्वतःच्या जीवनात अंगीकारले. त्या मार्गावर चालणारे विनोबा भावे, जयप्रकाश नारायणासारखे अनेक सत्याग्रही निर्माण केले. गांधीवाद एक संदेश आहे. जीवन जगण्याचे तत्वज्ञान आहे. मानवाच्या शाश्वत विकासाचे शाश्वत सुत्र आहे. मानवी संबंधाना मुल्यांच्या सुत्रात गुंफणारी माळ म्हणून सदैव आठवणीत राहतील. ज्यांच्याशिवाय या पथभ्रष्ट विश्वात शांतता प्रस्थापित होवू शकत नाही.

सारांशतः आज जगातल्या कोणत्या ही देशात निघणारा शांती मोर्चा, कॅन्डल मोर्चा, अन्याय व अत्याचाराचा विरोध करण्याचे लोकशाहीवादी मार्ग व हिंसेस अहिंसेने उत्तर देणे या सर्व प्रसंगी संपुर्ण जगाला गांधी तत्वज्ञानाची आठवण होते. पुढेही होईल. याचा अर्थ गांधीजी, त्यांचे विचार तत्वज्ञान, सिध्दांत भूतकाळातही प्रस्तुत होते, आज ही आहेत. तसेच हे विश्व असेपर्यंत प्रस्तुत असतील.

**संदर्भ ग्रंथ :**


१. बराक ओबामा - संजय आवटे - मनोविकास प्रकाशन, पुणे.
२. गांधी - नेहरु - अम्बेडकर- सामाजिक न्याय एंव राजनीति - कान्ता मीणा - हेमराज मीणा - आदि पब्लीकेशन्स, जयपूर.
३. लढा दहशतवादाशी अमेरिका आणि भारत - जितेंद्र दिक्षीत - जीवनरंग प्रकाशन - मुंबई.
४. सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा - महात्मा गांधी - साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
५. Diwaker R.P. - The Relevance of Gandhi.
६. चंद्रशेखर धर्माधिकारी - शोध गांधीचा - अक्षर प्रकाशन, मुंबई.


❑❑❑



Scanned by CamScanner